॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)



## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २८ ऑगस्ट : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन, अत्याधुनिक सुविधांचे उद्घाटन तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक व व्यावसायिक अनुभवाच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या उपक्रमांचा शुभारंभ अशा विविध कार्यक्रमांच्या आयोजन उद्या दि २९ ऑगस्ट रोजी दुपारी १.३० मिनिटांनी विद्यापीठातील अधिसभा सभागृहात करण्यात आले आहे.

राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते हे भूमिपूजन व उद्घाटन होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी राहणार आहेत. जळगाव जिल्ह्याचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, विद्यापीठ सल्लागार समितीचे अध्यक्ष अशोक जैन, प्र-कुलगुरू प्रा. सोपान इंगळे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेंद्र नन्नवरे तसेच सर्व व्यवस्थापन परिषद सदस्य यांची उपस्थिती राहणार आहे.

विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची दर्जेदार तयारी करण्यासाठी आवश्यक सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने 'सेंटर फॉर ट्रेनिंग फॉर कॉम्पिटिटिव्ह एक्झामिनेशन' च्या इमारतीचे भूमिपूजन यावेळी करण्यात येणार आहे. त्यासोबतच 'सोफिस्टिकेटेड ॲनॅलिटिकल इन्स्ट्रुमेंटेशन फॅसिलिटी सेंटर'च्या फेज-१च्या इमारतीचेही भूमिपूजन होणार आहे. आधुनिक संशोधनाला चालना देण्यासाठी अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरणे व संशोधन सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे केंद्र महत्त्वाचे ठरणार आहे.

पीएम-उषा निधीअंतर्गत विद्यापीठाच्या परिसरात १० ठिकाणी उभारणी केलेल्या अत्याधुनिक कंटेंट स्टुडिओचे ऑनलाइन पद्धतीने उद्घाटन करण्यात येणार आहे. डिजिटल शिक्षण, ई-कंटेंट निर्मिती, ऑनलाइन अभ्यासक्रम, व्याख्याने तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांचे डिजिटल स्वरूपात प्रसारण आणि नोंदणी करण्यासाठी या स्टुडिओचा उपयोग होणार आहे. त्यामुळे विद्यापीठातील अध्यापन अधिक तंत्रज्ञानाधिष्ठित आणि विद्यार्थीकेंद्र करण्यास मदत होणार आहे.

तसेच विद्यापीठाच्या नंदुरबार येथील आदिवासी अकादमीमार्फत संचलित आदिवासी अध्यासन केंद्राचेही उद्घाटन यावेळी करण्यात येणार आहे. विद्यापीठातील बी.ए. अप्लाइड सोशल सायन्सेस या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कार्यक्षेत्राचा अनुभव मिळावा आणि त्यांच्या व्यावसायिक कौशल्यांचा विकास व्हावा, यासाठी कांताई नेत्रालयासोबत सामंजस्य करार करण्यात येणार आहे.

एकाच दिवशी पायाभूत सुविधा, डिजिटल शिक्षण, अत्याधुनिक संशोधन सुविधा, आदिवासी समाजाच्या अभ्यासासाठी स्वतंत्र शैक्षणिक केंद्र आणि विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासासाठी उद्योग-संस्था सहकार्य अशा विविध क्षेत्रांतील उपक्रमांना चालना मिळणार आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या अध्यापन, संशोधन, कौशल्यविकास आणि सामाजिक बांधिलकी या चारही आघाड्यांना बळकटी मिळणार आहे.

.....................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २८ ऑगस्ट, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,जळगाव

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता